# असोसिएशन ऑफ कॉलेज ॲन्ड युनिव्हर्सिटी सुपर ॲन्युएटेड टीचर्स, महाराष्ट्र

## ९ वी, वार्षिक सर्वसाधारण सभा, नाशिक

दिनांक :- २२/१२/२०१९

बंधु / भगिनिंनो,

असोसिएशनने वर्ष २०१८-१९ या वर्षात केलेल्या कार्याचा वृत्तांत केन्द्रीय कार्यकारणीच्या वतीने मी प्राचार्य, डॉ.जे.एम.मंत्री आपल्या समोर सादर करीत आहे.

**१) वार्षिक सर्वसाधारण सभा औरंगाबाद :-**

वर्ष २०१८-१९ ची वार्षिक सर्वसाधारण सभा औरंगाबाद येथे दोन सत्रात संपन्न झाली. या बाबतचा सविस्तर वृत्तांत सचिवांनी आपल्या समोर ठेवला आहे. औरंगाबाद विभागाचे अध्यक्ष प्राचार्य भालेराव पी.के., सचिव डॉ.वाकळे बी.जी. व सर्व स.सदस्य यांनी मा.अध्यक्ष डॉ.वाहूळ व सचिव प्रा.शफी यांच्या सेवा गौरव समारंभासाठी जे सहकार्य केले ज्यामुळे हा कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला त्या सर्वांचे मी हार्दिक आभार व्यक्त करितो. तसेच या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील सर्व शाखांचे व ज्या सन्मानिय सदस्यांनी गौरव सोहळयास उत्स्फूत देणग्या दिल्या ज्यामुळे असोसिएशन वर कुठलाच आर्थिक भार पडला नाही हे विशेष होय. सर्व विभागीय शाखा व सर्व देणगीदाराचे अमृत महोत्सव समितीच्या वतीने मनःपुर्वक आभार मानने मी माझे कर्तव्य समजतो.

**२) केंद्रीय कार्यकारणी सभा :-**

केंद्रीय कार्यकारणीच्या वर्षभरात एकूण तीन सभा घेण्यात आल्या. दिनांक १४/०७/२०१९ या सभेमध्ये वर्ष २०१९-२० ची वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी पुणे विभागाचा अर्ज आला होता त्यावर चर्चा करण्यात आली व सदर वार्षिक सर्वसाधारण सभा नाशिक येथे घेण्यास मान्यता देण्यात आली. त्या प्रमाणे आजची सभा होत आहे. आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देण्यात आली. असोसिएशनला प्रत्येक विभागातून सदस्यांच्या देणग्या येतात त्या देणग्याचे ४०% भाग त्या त्या विभागास देण्याचा निर्णय घेण्यात आला. विविध विभागात सदस्य बैठकीस येतात त्यांच्या प्रवास खर्च देण्यात प्रत्येक विभागात सुसुत्रता असावी त्यासाठी प्रा.नाफडे एस.बी. यांच्या अध्यक्षतेखाली तीन व्यक्तींची

एक कमेटी गठीत करण्यात आली. ती खालील प्रमाणे (१) प्रा.एस.बी.नाफडे (अध्यक्ष) (२) प्रा.ए.बी.कासार (सदस्य) (३) प्राचार्य एस.के. मोरे बार्शी (सदस्य)

हया कमेटीने आपला अहवाल केंद्रीय कार्यकारणीच्या पुढील बैठकीत विचारार्थ ठेवावा असे ठरविण्यात आले.सुधारित घटनेप्रमाणे असोसिएशनच्या बैठकीच्या सूचना एस.एम.एस.वॅटस ॲप अथवा ई-मेल द्वारे कळविण्याची तरतूद केली आहे. त्यासाठी असोसिएशनला एक मोबाईल व एक लॅपटॉप घेण्यास मंजूरी देण्यात आली. तसेच केंद्रीय कार्यालय सर्व सोयीयुक्त करणे बाबत निर्णय घेण्यात आला. दिनांक १२/११/२०१९ च्या सभेत वर्ष २०१८-१९ सप्टेंबर पर्यंत जे नवीन सदस्य झाले त्यांना मान्यता देण्यात आली.

संघटनेच्या केंद्रीय कार्यकारणीच्या पंच वार्षिक निवडणुकीसाठी नाशिक येथील प्रा.बी.व्ही.कापडणीस तर सह निवडणुक अधिकारी म्हणून प्रा.डॉ.बी.एम.आहेर यांची नियुक्ती करणेस मान्यता देण्यात आली. सचिव तथा कोषाध्यक्षांनी सुधारित सदस्यांची अद्यावत मतदार यादी बैठकीमध्ये सादर केली त्यास केंद्रीय कार्यकारणीने मान्यता दिली. संचालक डॉ.गायकवाड एम.जी.यांनी मेंबरशिप फार्मचे स्कॅनिंग करुन संपूर्ण रेकॉर्डचे डीजीटायलायझेशन करणेची सूचना केली त्यास मान्यता देण्यात आली.

**३) न्यायालयीन याचिका संबंधी अहवाल :-**

**सेवानिवृत्त वेतन सुधारणा :-**

**(i) ५ वा वेतन आयोग व ४ था वेतन आयोग :-** मागील वर्षीच्या कार्यवृत्तांत मध्ये या याचिका बाबत प्रगती अहवाल आपण दिला होता. शासनाने आपली याचिका क्रमांक ४२९२/१३ खंडपीठ औरंगाबाद यांनी जे निर्देश दिले त्याचा विचार न करता दिनांक ०५/०३/२०१६ असे कळविले की राज्य शासन त्यांच्या अर्थसहाय्यातून सेवानिवृत्ती वेतन देते त्यामुळे याचिकाकर्त्याची ५०% सेवानिवृत्ती वेतनाची मागणी अनुज्ञेय नसल्यामुळे मान्य करता येत नाही.

न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचा शासनाने कुठलाच विचार केला नाही त्यामुळे आपण रीव्हीजन पिटीशन क्र.४५५४/२०१६ दाखल केले आहे याबाबत ऑक्टोंबरमध्ये आपल्या वकीलांनी आपली पुर्ण बाजू मांडली. मात्र शासनाचे वकील तयारी न करताच प्रत्येक वेळी येत होते. शेवटी न्यायालयाने त्यांना ताकीद दिली पुढच्या तारखेस आपण आपली बाजू मांडावी

नसता आपणास रु.१०,०००/- चा दंड लावण्यात येईल असा आदेश दिला. योगायोगाने त्यानंतर दिपावलीच्या

सुट्टया लागल्या व सुट्टयानंतर सदर बेंच बदलले त्यामुळे आता पुन्हा नवीन बेंच समोर सुनावणी करावी लागेल, या बाबत आपण सारखा पाठपुरावा करीत आहोत मात्र अद्याप याचिका सुनावणीची तारीख मिळाली नाही या संबंधीच्या तिन्ही याचिका (५ वा वेतन आयोग याचिका क्र.४५५४/२,१६,याचिका क्र.५०४२/२०१६ व ४ था वेतन आयोग याचिका क्र.५२०४/२०१४) प्रलंबित आहेत. मध्यंतरीच्या काळामध्ये याबाबत सर्वोच्च न्यायालयात काही चांगले निकाल लागले ते आपणास पाठबळ देणारे आहेत. ११ जुलै २०१९ रोजी न्यायमुर्ती शाह एम.आर. व न्या.ए.एस.बोपन्ना यांनी जो निकाल दिला आहे तो फार महत्वाचा आहे. हा निकाल मनिपूर स्टेट पेन्शन असोसिएशन वि.स्टेट ऑफ मणीपूर याचिके मध्ये दिला आहे. त्यात ते म्हणतात.

Classification of Ponsioners for providing cut off date for purpose of grant of revised pension is unconstitutional State cannot orbitarily pick and chose from amongst similary situated persons a cut off date for extension of benefits

अलिकडे व्ही.कस्तुरी वि. जनरल मॅनेजर एस.बी.आय. मुंबई १९९८ या याचिकेच्या निकालानंतर राज्य शासनाने दिनांक १५/११/२०१९ ला जी.आर. काढून ५०% पेन्शनची हमी दिली आहे. या सर्व गोष्टींची संपूर्ण माहिती असोसिएशनकडे आहे. याचा निश्चितच फायदा या याचिकेसाठी होईल.

**(ii) पीएच.डी. वेतनवाढी संबंधी :-**

दिनांक ०१/०१/१९९६ नंतर पीएच.डी. प्राप्त केलेल्या प्राध्यापकांना दिनांक २७/०७/१९९८ पासून शासनाने दोन वेतनवाढी ५ व्या वेतन आयोगात मंजूर केल्या. प्रत्यक्षात मात्र पाचवा वेतन आयोग दिनांक ०१/०१/१९९६ पासून लागू केला त्यामुळे पीएच.डी. वेतनवाढी देखील दिनांक ०१/०१/१९९६ पासून देणे आवश्यक होते. ते दिले नसल्यामुळे आपण याबाबत मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद मध्ये तीन याचिका दाखल केल्या होत्या.

(i) याचिका क्र.१०४३१/२०१२ याचिकाकर्ते १०१ निकाल दिनांक १५/०७/२०१४ मात्र शासनाने सदर याचिकेच्या निकालाची अंमलबजावणी दिलेल्या मुदतीत न केल्यामुळे आपण खंडपीठात अवमान याचिका क्र.५४५/२०१४ दाखल केली होती या विरुध्द शासनाने विशेष अनुमती याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. मात्र खंडपीठाच्या आदेशास सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली नाही त्यामुळे विधी व न्यायविभागाच्या परिपत्रक दिनांक ०२/०४/२०१४ प्रमाणे उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करणे शासनास भाग पडले. त्या प्रमाणे शासनाने दिनांक २८ एप्रिल २०१५ च्या आदेशाने ९६ याचिका कर्त्याच्या दोन वेतनवाढीची रक्कम रुपये ३८,७१,७१२/- खंडपीठ औरंगाबाद येथे जमा केली. सदर रक्कम खंडपीठ औरंगाबाद यांनी फिक्स डीपॉजीट मध्ये बँकेत ठेवली त्यामुळे वितरणाच्या वेळी दोन वेतनवाढीच्या फरकाची रक्कम रुपये २८००० व त्यावर व्याज साधारणतः ३००० प्रत्येक याचिका कर्त्यास दिनांक १५/११/२०१६ रोजी औरंगाबाद खंडपीठात बोलावून आपल्या सहकार्याने वितरीत करण्यात आली हे आपणास यापूर्वी कळविले आहे.

याचिका क्र.९६६/२०१६ याचा निकाल दिनांक १८/०३/२०१६ व याचिका क्र.१२१२२/२०१७ निकाल दिनांक ०६/१०/२०१७ ला लागला मात्र यामध्ये देखील शासनाने निकालाची अंमलबजावणी केली नसल्यामुळे आपण अवमान याचिका अ.क्र.२०९/२०१७ व ३६०/२०१९ दाखल केल्या तरी परंतू या शासनाने उपरोक्त तिन्ही याचिका विरुध्द सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका डायरी क्र.१३२७४/२०१५ क्र.१६२७४/२०१८ दाखल केल्या. सर्वोच्च न्यायालयाने सदरहू विशेष अनुमती याचिका दिनांक १४/०३/२०१९ रोजी फेटाळून लावलेल्या आहेत. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाने अवमान याचिकांच्या आदेशाचे अनुपालन न झाल्यामुळे अनुपालन करणेसाठी शासनाने दिनांक १३/०९/२०१९ रोजी शासन आदेश काढले असून १ जानेवारी १९९६ पुर्वी पीएच.डी. झालेल्या अधिव्यख्यात्यांना अगाऊ दोन वेतनवाढी मंजूर करण्याचे आदेश दिले आहेत. विभागीय सह संचालकांनी त्याची अचूक परिगणना करुन दोन वेतन वाढीचा लाभ द्यावा त्यासाठी लागणा-या ५,२४,३८२२० खर्चास मंजूरी दिली आहे.

**(iii) नवीन याचिका :-**

**नोशनल एका वेतनवाढ संबंधी :-** दिनांक १ जुलै सेवा निवृत्ती असतांना त्यांना ३० जुन रोजी सेवानिवृत्त केले जाते. त्यामुळे सदर प्राध्यापकांना एका वेतनवाढीचा लाभ मिळत नाही. ही वेतनवाढ मिळावी यासाठी एका याचिकेचा निकाल मद्रास उच्च न्यायालयाने दिनांक

१५/०९/२०१९ रोजी दिला व सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी हस्तक्षेप करणेस नकार दिला. सदरची माहिती डॉ.एम.एन.जाचक अध्यक्ष पुणे विभाग यांना मिळाली व त्यांनी अशा प्रकारची याचिका आपण टाकावी या साठी पाठपुरावा केला त्याप्रमाणे आपण अशा प्रकारे नोशनल वेतनवाढ मिळण्यासाठीची ९९ सदस्यांची याचिका खंडपीठ औरंगाबाद येथे दिनांक ३०/०७/२०१९ रोजी दाखल केली आहे.

**(iv) ५ व्या वेतन आयोगातील दिनांक ११/१२/१९९९ च्या शासन परिपत्रका प्रमाणे १२०००-१८३०० श्रेणीतील प्राध्यापकांच्या ५ वर्षातील सेवेनंतर कमीत कमी १४९४० वर वेतन निश्चिती करणे बाबत.:-** असे निदर्शनास आले आहे की, ब-याच प्राध्यापकांना उपरोक्त वेतन श्रेणीत ५ वर्षानंतर १४९४० वर वेतन निश्चित केलेले नाही. किंवा काहींना वेतन निश्चित करुन वेतन दिले मात्र नंतर त्यांच्याकडून सदर रक्कमेची वसुली केली आहे त्यामुळे ते हया लाभापासून वंचित आहे. अशा प्राध्यापकांना वेतन निश्चितीचा लाभ मिळावा म्हणून एक याचिका खंडपीठात दाखल करण्याचे असोसिएशनने ठरविले आहे. त्यासाठी एकूण ३६ याचिका कर्त्यांनी सर्व कागदपत्रासह याचिका दाखल करणेस संमती दिली आहे. लवकर ती याचिका दाखल करण्यात येईल.

**४) असोसिएशनचे मा. अध्यक्ष डॉ.एम.ए.वाहूळ तथा सचिव प्राचार्य मोहमद शफी यांचा विविध शाखेतर्फे अमृत महोत्सवी सत्कार.**

औरंगाबाद येथे १ जानेवारी २०१९ रोजी मा.अध्यक्ष डॉ.वाहूळ तथा सचिव मो.शफी यांच्या अमृत महोत्सवी गौरव सोहळयानंतर विविध विभागातर्फे हयांचा अमृत महोत्सवी सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

**i) पुणे विभाग नाशिक :- दि.२०/०१/२०१९**

हा सत्कार मा.डॉ. माणिकराव सोळुंखे, मा.कुलगुरु भारती विद्यापीठ, पुणे यांच्या हस्ते प्राचार्य डॉ.व्ही.बी. गायकवाड, के.टी. एच.एम. कॉलेज यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. त्यानंतर पुणे विभागाची वार्षिक सभा अध्यक्ष पदाधिका-यांच्या उपस्थितीमध्ये घेण्यात आली.

**ii) कोल्हापूर विभागाच्या वतीने दिनांक २७/०१/२०१९**

मा.श्री.श्रीनिवास पाटील माजी राज्यपाल सीक्कीम यांचे हस्ते या दोघांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे मा.कुलगुरु डॉ.देवानंद शिंदे हे होते या कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाचे प्र.कुलगुरु डॉ.डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही.एन.शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कोल्हापूर विभागाचे अध्यक्ष डॉ.मानसिंह जगताप तथा सर्व पदाधिकारी व सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते.

**iii) सोलापूर विभाग :-**

प्राचार्य डॉ.एम.ए. वाहूळ यांचा हा सत्कार सोहळा दिनांक २४/०२/२०१९ रोजी भारती विद्यापीठ हॉल मध्ये घेण्यात आला. हा सत्कार मा.श्री.सुशीलकुमारजी शिंदे माजी केंद्रीय गृहमंत्री भारत सरकार यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ.इरेश स्वामी हे होते. या प्रसंगी डॉ.व्ही.एस.मगनाळे संचालक भारती विद्यापीठ सोलापूर तसेच प्राचार्य के.एम.जमादार व विभागीय अध्यक्ष प्राचार्य व्ही.एन. इंगळे, पदाधिकारी व सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते.

**iv) जळगांव विभाग- धुळे दिनांक १७/०३/२०१९.**

माजी कुलगुरु प्रा.के.बी.पाटील यांचे हस्ते प्राचार्य डॉ.वाहूळ यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रा.सुधीर पाटील (सी.डी.सी.चे चेअरमन) यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच जळगांव विभागाचे अध्यक्ष प्राचार्य आर.डी.राणे तथा इतर सर्व पदाधिकारी उपस्थित होते. हा कार्यक्रम जयहिंद महाविद्यालयामध्ये संपन्न झाला. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एच. पवार यांचे सक्रीय सहकार्य मिळाले. कार्यक्रम यशस्वी करण्यास डॉ.शशीकला पवार व डॉ.बबनराव पवार यांनी परिश्रम घेतले.

**v) बारामती :- दिनांक १०/०३/२०१९.**

बारामती येथील अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या एम.बी.ए.विभागात प्राचार्य डॉ.एम.ए.वाहूळ यांचा सत्कार प्रा.बी.बी.पाटील यांचे हस्ते करण्यात आला.या कार्यक्रमासाठी केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रा.एस.बी.नाफडे पुणे विभागाचे अध्यक्ष डॉ.एम.एन.जाचक व टी.सी. महाविद्यालयाचे सेवानिवृत्त कर्मचारी संघाचे अध्यक्ष आर.एन.सुरवडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन डॉ.डी.बी.जगताप यांनी केले.

**५) विविध विभागांना भेटी :-**

केन्द्रीय पदाधिका-यांनी विविध शाखेच्या सदस्यांच्या समस्या जाणून घेण्याच्या दृष्टीने भेटी देवून त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन केले त्याचा तपशिल येणे प्रमाणे.

**i) उस्मानाबाद :- दिनांक २६/०२/२०१९**

उस्मानाबाद येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात ही बैठक घेण्यात आली या बैठकीमध्ये प्रा.सी.एस.पाटील यांची त्या जिल्हयाचे काम करणेसाठी संबंधीत प्राध्यापकांची निवड केली बैठकीचे संयोजन प्रा.बळे यांनी केले होते.

**ii) पुणे :- दिनांक ११/०८/२०१९**

असोसिएशनच्या स्थापने पासून पुणे शहरात आपली बैठक झाली नव्हती प्रथमच ही बैठक आबासाहेब गरवारे महाविद्यालयात माजी प्राचार्य एस.जी.गुप्ता यांच्या सहकार्याने घेण्यात आली. या बैठकीत प्रा.धनसिंग जगताप बारामती, प्रा.डॉ.ए.डी.नातू पुणे, प्राचार्य मीसाळ पुणे, प्रा.दामले पुणे, प्रा.बोराळकर नांदेड, प्राचार्य हजारे अकोला यांनी सहभाग घेतला. केंद्रीय कार्यकारणीचे उपाध्यक्ष डॉ.जे.एम.मंत्री यांनी असोसिएशनने विविध प्रश्नासाठी केलेल्या याचिकेचा आढावा सभेत सादर केला. सदस्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे कोषाध्यक्ष प्रा.एस.बी.नाफडे यांनी दिले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.वाहूळ यांनी असोसिएशन करीत असलेल्या कामाचा संपूर्ण आढावा घेवून अध्यक्षीय समारोप केला. पुणे विभागाचे अध्यक्ष डॉ.एम.एन.जाचक, सचिव डॉ.बी.एम. देवरे व कोषाध्यक्ष प्रा.एच.आर.देवचक्के यांनी बैठक यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

**(iii) अकोला (अमरावती विभाग) दिनांक ०७/०९/२०१९.**

अकोला येथील महाविद्यालयात प्राचार्य डॉ.हजारे व प्रा.भंडारी यांनी बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत प्राध्यापकांचे प्रश्नावर चर्चा करण्यात आली. प्राचार्य मंत्री व प्रा.नाफडे यांनी त्यांची उत्तरे दिली प्राचार्य वाहूळ यांनी अध्यक्षीय समारोप केल्यावर बैठक संपली.

**iv) अमरावती बैठक - दिनांक ०८/०९/२०१९**

अमरावती विभागाचे अध्यक्ष डॉ.अशोक राऊत व सचिव फारुकुल्ला यांनी बैठक आयोजित केली या बैठकीत न्यायालयीन याचिकेचा आढावा प्राचार्य डॉ.मंत्री यांनी घेतला. प्राध्यापकांच्या प्रश्नांवर प्रा.एस.बी.नाफडे यांनी उत्तरे दिली. डॉ.वाहूळ यांनी अध्यक्षीय समारोप केल्यावर बैठक संपली.

**v) कोल्हापूर बैठक - दिनांक ०६/१०/२०१९**

शिवाजी विद्यापीठ विभागाचे अध्यक्ष डॉ. मानसिंह जगताप यांनी ही बैठक बोलावली त्या बैठकीसाठी केंद्रीय अध्यक्ष, कोषाध्यक्ष व सचिव उपस्थित होते बैठकीमध्ये शिवाजी विद्यापीठातील जे प्राध्यापक दिनांक ०१/०१/१९८६ पुर्वी पीएच.डी. झाले त्यांना तीन वेतन वाढी मिळण्या संबंधीच्या प्रश्नांच्या प्रगती अहवाल डॉ.वाहूळ सरांनी मांडला. प्राचार्य डॉ.चौगुले जे.बी. यांनी प्राचार्यच्या वेतन श्रेणी बाबत मुंबई खंडपीठातील याचिका प्राचार्य असोसिएशनने जिंकली असल्याची माहिती सभेत दिली. पाचव्या वेतन श्रेणीतील प्राध्यापकांना पाच वर्षाच्या सेवेनंतर १४९४० वेतन श्रेणी दिल्यानंतर त्याची वसुली करण्यात आली. काही सदस्यांनी त्यावर प्रश्न उपस्थित केला त्यावर विचार करुन सोडविण्याच्या विचार करण्यात येईल असे मा.अध्यक्षांनी सांगितले. एक नोशनल वेतनवाढ संबंधी याचिका दाखल केल्याची माहिती प्रा.एस.बी.नाफडे यांनी दिली. सहाव्या वेतन आयोगातील वेतन सुधारणा परिपत्रक शासनाने दिनांक १२ मार्च २०१८ रोजी काढले त्या प्रमाणे दिनांक ०१/०१/२००६ ते दिनांक २६/०२/२००९ या कालावधीत सेवानिवृत झालेल्या सेवानिवृत्ती धारक प्राध्यापकांना ११ लाख पासून ते ३१ लाख पर्यंत वेतन फरकाची रक्कम मिळाली हे फार मोठे यश असोसिएशनचे आहे असे बैठकीमध्ये सदस्यांनी नमुद केले.

**vi) नाशिक बैठक दिनांक २०/११/२०१९**

वार्षिक सर्व साधारण सभेच्या कामाच्या प्रगतीची माहिती घेणेसाठी केंद्रीय पदाधिका-यांनी नाशिक विभागास भेट दिली.

**vii) अहमदनगर बैठक  दिनांक २९/११/२०१९**

ही बैठक राधाबाई काळे महिला महाविद्यालयात घेण्यात आली. या बैठकीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य पाटील यांचे सहकार्य लाभले. बैठकीचे संयोजन प्राचार्य विश्वास काळे यांनी केले होते. पुणे विभागाचे अध्यक्ष व पदाधिकारी बैठकीस उपस्थित होते.

६)	**उच्च शिक्षण संचालक पुणे बैठक :-**

दिनांक २९/०९/२०१९ रोजी पीएच.डी. च्या ज्या दोन याचिका अ.क्र.९६६ व १२१२२ यांचा निकाल अ.क्र./१८/३/१६ व ६/१०/२०१७ रोजी लागला त्या प्रमाणे दिलेल्या मुदतीत शासनाने वेतन वाढी दिनांक ०१/०१/१९९६ पासून देण्याची कार्यवाही केली नाही त्या संबंधी अवमान याचिका चा निकाल देखील लागला त्या बाबत कार्यवाही करणे बाबत चर्चा करण्यात आली. तसेच दिनांक ०१/०१/१९८६ पुर्वी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर च्या प्राध्यापकांना तीन वेतनवाढी दिल्या नाहीत याचा पाठपुरावा करण्यासाठी सह संचालका सोबत बैठक घेण्यात आली. कोल्हापूर विद्यापीठातील प्राध्यापकांच्या वेतनवाढीचा प्रश्न ही निकाली लागला आहे. याबाबत शासनाने तत्कालीन अर्थमंत्र्यानी सचिव उच्च व तंत्र विभागास पुढील कार्यवाहीस पत्र पाठविले आहे. दुसरी बैठक दिनांक १८/११/२०१९ रोजी घेण्यात आली. या बैठकीमध्ये काही प्राचार्य व प्राध्यापकांच्या सेवानिवृत्ती वेतना संबंधी चर्चा करुन पुढील योग्य ती कार्यवाही करण्याचे मान्य करण्यात आले.

७)	**एआयफ्रुक्टो पदाधिकारी सोबत बैठक :-**

दिनांक ०८/०६/२०१९ रोजी एआयफ्रुक्टोचे सेक्रेटरी सोबत औरंगाबाद येथे बैठक झाली. एआयफ्रुक्टोच्या एकूण कार्याचा आढावा त्यांनी मा.अध्यक्षांना सादर केला. ७ व्या वेतन आयोगामध्ये अंडरग्रज्युएट व पदव्युत्तर प्राचार्य यांच्या स्केल मध्ये यु.जी.सी.ने फरक केला आहे त्यावर चर्चा करण्यात आली व प्राचार्यांच्या पगारात अशा प्रकारे तफावत नसावी या साठी विद्यापीठ अनुदान मंडळाला पाठपुरावा करण्याचे ठरविण्यात आले.

दुसरी बैठक एआयफ्रक्टोचे संचालक एम.संतोषकुमार यांच्या सोबत झाली असून या बैठकीत ७ व्या वेतन आयोगातील प्राचार्यांच्या सेवानिवृत्ती वेतनावर चर्चा करण्यात आली. सदर वेतन ६ व्या वेतन आयोगातील मुळ वेतनास २.५७ ने गुणाकार करुन ७ व्या वेतन आयोगात वेतन देण्यात येते. त्या ऐवजी प्राचार्याच्या ६ व्या वेतन आयोगातील मुळ वेतनास २.७४ ने गुणाकार करुन त्याप्रमाणे वेतन ७ व्या वेतन आयोगात द्यावयास पाहिजे या संबंधी एक याचिका सर्वोच्च न्यायालयात टाकावी या संबंधी चर्चा झाली शिवाय आंध्र प्रदेशात सेवानिवृत्तांना ब-याच सवलती हे शासन देतो याची माहिती त्यांनी बैठकीत दिली. त्यांच्याकडे सेवानिवृत्तीधारकांना हेल्थ कार्ड दिले जाते व त्याद्वारे ३,५०,००० पर्यंतच्या आजाराचा खर्च मोफत केला जातो.

प्रत्येक जिल्हयामध्ये एक हॉस्पीटल त्यांच्या हया सवलतीसाठी ठरविण्यात आलेले आहे. शिवाय सेवानिवृत्तांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना एक महिन्याचे वेतन अंत्यविधीसाठी देण्यात येते हे विशेष होय. डोळयाचे तसेच गुडघ्याचे ऑपरेशनस मोफत केले जातात अशी माहिती त्यांनी हया बैठकीत दिली. त्याप्रमाणे पुरोगामी महाराष्ट्रात सोयी मात्र नाहीत हे प्रकर्षाने जानवते.

**८) घटना दुरुस्ती प्रस्तावास मान्यता :-**

आपण बार्शी येथील विशेष सर्वसाधारण सभेत घटना दुरुस्ती प्रस्तावास मंजूरी दिली होती सदर प्रस्ताव दिनांक ०६/०४/२०१८ रोजी मा.धर्मादाय आयुक्त यांचे मान्यतेसाठी सादर केला होता. त्यांनी दिनांक ०४/०४/२०१९ रोजी त्यास मंजूरी दिली. आपल्या माहितीस्तव.

**९) कार्यालयाची रजिस्ट्री.**

आपण ॲक्युसॅटचे कार्यालय खरेदी केले मात्र त्याची रजिस्ट्री राहिली होती. आपणास कळविण्यास आनंद होतो की सदर रजिस्ट्री दिनांक ०८/११/२०१९ रोजी मा.अध्यक्ष व सचिवांच्या नावाने करण्यात आली आहे.

**सामाजिक कार्य :-**

यंदा सांगली व कोल्हापूर जिल्हयामध्ये अतिवृष्टीने बरीच मोठी हानी झाली होती. अनेक घरे पाण्याखाली गेली बरेच लोक बेघर झाले. हया महाभयंकर पूरग्रस्तांसाठी आपण असोसिएशनच्या वतीने २ लाख रुपयाची देणगी दिली. तसेच व्यक्तिगत देणगी सर्व सदस्य व विभागांनी करावी असे आवाहन मा.अध्यक्षांनी केले त्या प्रमाणे विविध विभागांनी या साठी मदत केली त्याची माहिती त्या त्या विभागाच्या अहवालात देण्यात आली आहे. व्यक्तिगतरित्या औरंगाबाद मध्ये ही ब-याच सदस्यांनी मदत केली आहे त्यांना आयकरामध्ये सवलत मिळते म्हणून ही रक्कम एकत्र करुन आपण भरली नाही. प्रस्तुत कार्यवृत्तांत आपल्या माहितीस्तव

धन्यवाद !

प्राचार्य
डॉ.जे.एम.मंत्री
(उपाध्यक्ष)